# शिवकृपा 'दीपस्तंभा'ची ३० वर्षांची गौरवशाली वाटचाल

महाराष्ट्राच्या सहकार चळवळीत आदर्शवत काम करणारी शिवकृपा सहकारी पतपेढी आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या आदर्श सहकारी चळवळीच्या विचाराने वाटचाल करत दि. २२ नोव्हेंबर रोजी ३० वा वर्धापनदिन साजरा करत असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अविनाश भोसले यांनी दिली.



अविनाश ता. भोसले
अध्यक्ष



हणमंत ह. गायकवाड
उपाध्यक्ष



पंढरीनाथ ता. भोसले
मानद सचिव



कृष्णा तु. शेलार
संस्थापक संचालक



चंद्रकांत श्री. वंजारी
संस्थापक संचालक

१९८२ मध्ये स्थापन झालेल्या या संस्थेच्या प्रगतीत अध्यक्ष अविनाश भोसले, उपाध्यक्ष हणमंत गायकवाड, मानद सचिव पंढरीनाथ भोसले, संस्थापक संचालक कृष्णा शेलार, चंद्रकांत वंजारी यांच्यासह सर्व आजी माजी संचालक, अधिकारी, कर्मचारी, ठेव संकलन प्रतिनिधी यांचे मोलाचे योगदान आहे. त्यास संस्थेचे असंख्य सभासद, ठेवीदार, हितचिंतक व कर्जदार यांनी संस्थेवर केलेले प्रेम, प्रतिसाद, विश्वास आणि सहकार्यामुळेच सहकारातील नवीन आव्हाने पेलण्याची उमेद मिळाली. त्यामुळेच शिवकृपा एका नव्या दिशेने झेपावली आहे, असे भोसले यांनी सांगितले.

संस्थेच्या प्रगतीची माहिती देताना ते म्हणाले, संस्थेच्या संपूर्ण महाराष्ट्र कार्यक्षेत्रात ६३ शाखा व ५ विभागीय कार्यालयांद्वारे संस्थेचा एकूण व्यवसाय १२८५ कोटी रुपयांचा असून, ठेवी ७०७ कोटी तर कर्जे ५७८ कोटी रुपयांच्या आहेत. संस्थेचा मार्च २०१२ अखेर ढोबळ नफा ६ कोटी रुपये आहे. वसुलीच्या अतिशय महत्त्वाच्या आघाडीवरही संस्थेने उत्तम प्रगती केली असून, येणे कर्जाशी थकबाकीचे शेकडा प्रमाण १.१७ टक्के इतके अत्यल्प राखीत सहकार कायद्यातील निकषांची पूर्तता केली आहे. संस्थेत ५०५ कर्मचारी, ८८७ ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत.

### विविध पुरस्कार, सन्मान

शिवकृपा पतपेढी व्यावसायिक व गुणात्मक दर्जा या बाबींवर विविध संस्था आणि सहकार खात्यांमार्फत विविध पुरस्कारांनी सन्मानित झाली आहे. २००१ मध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचा सर्वोत्कृष्ट आदर्श पतसंस्था पुरस्कार, २००१ ते २००६ या कालावधित अहवाल स्पर्धेत मुंबई पूर्व उपनगरे फेडरेशनचा पुरस्कार, राष्ट्रीय सहकाराकरीता विकास प्रबंधन संस्था, वर्धा यांचा २००४-०५ या वर्षी अत्युत्कृष्ट संस्था पुरस्कार, २०१०-११ या आर्थिक वर्षात मुंबई विभागीय सहकारी पतसंस्था फेडरेशनचा आदर्श पतसंस्था पुरस्कार आयुक्त मधुकर चौधरी यांच्याहस्ते आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात मिळाला आहे.

### प्रभावी नियंत्रण

संस्थेच्या महाराष्ट्रात ६३ शाखा आणि ३१ कार्यालये स्वमालकीच्या जागेत आहेत. सर्व शाखा सुसज्ज, वातानुकुलीत, संगणीकृत असून, सर्व शाखांच्या दैनंदिन कामकाजाचे योग्य नियोजन, नियंत्रण ठेवण्यासाठी प्रशासकीय कार्यालय तसेच मुंबई, ठाणे, पुणे, सातारा, कोरेगाव अशी ५ विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. तसेच कोरेगाव येथे स्वमालकीच्या जागेत प्रशिक्षण केंद्र कार्यान्वित असून, त्याद्वारे सेवक वर्गास प्रशिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

बँकिंग व सहकार क्षेत्रातील आव्हाने विचारात घेता संचालक मंडळाने अत्याधुनिक तंत्राचा अवलंब करीत ....सेवा, व्हिडिओ कॉन्फरंसिंग सेवा, संगणक प्रणालीद्वारे ग्राहकांना तत्पर, अचूक अद्ययावत माहिती उपलब्ध करुन देण्याबरोबरच अधिकार विकेंद्रीकरणाच्या कक्षा व्यापक केल्यामुळे निर्णय प्रक्रिया आणि दर्जेदार सेवा ग्राहकांना मिळत आहे.

विविध पतसंस्थांना मार्गदर्शक व पालकत्वाची भूमिका संस्थेने बाजावली असून, आर्थिक अवसायानात आलेल्या पतसंस्था यांचे शिवकृपात विलीनीकरण करुन ठेवीदारांचे हित सांभाळले आहे.

### सामाजिक बांधिलकी

वृक्षारोपण, वृक्षसंवर्धन, सार्वजनिक वाचनालये, आषाढी वारीतील वारकऱ्यांना वैद्यकीय मदत, ग्रंथ महोत्सव आयोजनासाठी योगदान, देहू येथील तुकाराम महाराज गाथा मंदिरांसाठी आर्थिक सहकार्य, विद्यार्थी दत्तक योजना, दुष्काळी परिस्थिती निवारण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा, वृध्दाश्रम मदत इत्यादी स्वरुपात सामाजिक बांधिलकी जोपासली आहे.

ग्राहक राजा असून, त्याच्या व्यवसायाच्या सूचना आणि शुभेच्छांद्वारे कामकाजामध्ये बदल करुन ग्राहकाभिमुख सेवा देता यावी, तसेच संस्थेच्या कार्यप्रणालीची माहिती व्हावी, याकरिता संस्था दरवर्षी ऑक्टोबर हा महिना 'स्नेहसंवर्धन महिना' म्हणून राबवित असते.

संस्थेच्या गौरवशाली वाटचालीमध्ये संचालक सखाराम संकपाळ, वसंतराव चव्हाण, भीमराव बोराडे, सोपान बोराडे, बाळासाहेब मोहिते, जयवंत खामकर, अशोक तुपे, बबन काटे, अशोक शिंदे, शिवाजी वरुडे, ॲड. अशोक शिंदे, संचालिका निर्मला ऐवळे, उषा जाधव, कर्मचारी प्रतिनिधी सुनील जाधव, मुख्य कार्यकारी अधिकारी पांडुरंग धाडगे, अधिकारी, कर्मचारी व ठेव प्रतिनिधी यांचे भरीव योगदान आहे. संस्था यापुढेही अशीच देदिप्यमान वाटचाल कायम ठेवत, महाराष्ट्रातील आदर्श आणि अग्रगण्य पतसंस्था म्हणून लौकिक ठेवेल. गेल्या ३० वर्षात संस्थेच्या सभासद, ठेवीदार आणि हितचिंतक यांनी संस्थेवर दाखविलेला विश्वास, प्रेम आणि प्रतिसाद याबद्दल भोसले यांनी आभार मानले.